# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**<u>दिनांक २०.०३.२०१९ रोजी (का.प.क्र.२८) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

बुधवार दिनांक २० मार्च २०१९ रोजी (का.क्र.प.२८) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,भाप्रसे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री. विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री. विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १०. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| ११. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १२. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १३. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| १४. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| १५. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| १६. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| १७. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| १८. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| १९. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| २०. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| २१. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| २२. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| २३. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| २४. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| २५. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| २६. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| २७. | स.स. श्री.शेख जफर अखतर |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| २९. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ३०. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ३१. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ३२. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ३३. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ३४. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ३५. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ३६. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ३७. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ३८. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ३९. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ४०. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ४१. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ४२. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ४३. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.रेणुकादास वैद्य :भारत देशाचे माजी संरक्षणमंत्री तसेच गोव्याचे विद्यमान मुख्यमंत्री पदी राहिलेले श्री.मनोहर पर्रिकर हे एक आदर्श नेता आदर्श व्यक्ती व कार्यकर्ता म्हणून त्यांची ख्याती आहे. त्यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी. तसेच शिवसेना सचिव श्री.मिलिंद नार्वेकर यांचे वडील स्व.केशवजी सखाराम नार्वेकर यांचे वृध्दापकाळामूळे वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करावी.

श्रीमती किती शिंदे :यास अनुमोदन आहे. तसेच गोव्याचे मुख्यमंत्री स्व.मनोहर पर्रिकर तसेच नारेगाव येथे चेंबर मध्ये पडून मयत झालेले लोकांना आणि माजी महापौर शिलाताई गुंजाळ यांचे पती सिताराम गुंजाळ यांचे दु:खद निधन झाले. त्यांनाही ही श्रध्दांजली अर्पण करावी.

(या प्रस्तावास श्री.नितीन साळवी श्री.रामेश्वर भादवे श्री.भाऊसाहेब जगताप श्री.सिताराम सुरे यांनी अनुमोदन दिले.)

मा.महापौर :भारत देशाचे माजी संरक्षण मंत्री व गोवा राज्याचे विदयमान मुख्यमंत्री श्री.मनोहर पर्रिकर यांना तसेच शिवसेना सचिव श्री.मिलिंद नार्वेकर यांचे वडील स्व.केशवजी नार्वेकर यांना तसेच स्व.जयराज पार्थीकर यांचेही निधन झाले ते सामाजिक कार्यकर्ते होते. तसेच स्व.सिताराम गुंजाळ या सर्वांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

(या वेळी स्व.मनोहर पर्रीकर स्व.केशवजी नार्वेकर तसेच स्व.जयराज पार्थीकर स्व.सिताराम गुंजाळ यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

मा.महापौर :सभेला कोरम पूर्ण नाही देशामध्ये लोकसभेची आदर्श आचारसंहिता लागू असल्यामूळे त्यांचे तंतोतंत पालन करायचे आहे त्या चौकटीच्या बाहेर जाऊन कुठलीही चर्चा निर्णय घेता येणार नाही. कोरम ही नाही ही सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ ११-३५ वा. पुन्हा ११-४५ वा सभेला सुरूवात).

(या वेळी महापालिकेत नवीन अधिकारी आलेले श्री.किरणकुमार चव्हाण श्रीमती विजया घडगे यांनी त्यांचा परीचय करून दिला.)

मा.महापौर :श्रीमती सविता खरपे तीन महिन्यापासून रजेवर आहेत. त्यांची रजा कन्टिन्युव्ह झाली का? आचारसंहितेमध्ये अधिकारी यांचे रजा रद्द झालेल्या आहेत का? त्या रूजू का होत नाहीत? आज कोणते अधिकारी रजेवर आहेत? अत्यावश्यक सेवा जसे की, पाणीपुरवठा, ड्रेनेज अग्निशमन, जलनिःस्सारण असेल या विभागातील कर्मचारी यांना निवडणुकीच्या सेवा देऊ नये. तसे पत्र देऊन कळविण्यात यावे. परत कोरम अभावी सभा ०५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ ११-५५ वा पुन्हा सभा १२-०० वा.सुरूवात).

श्री.सिताराम सुरे :एन-७ च्या टाकीवर श्री.मानकापे नावाचे कर्मचारी काम करावे. त्यांनी असे सांगितले की पाच दिवसा ऐवजी ६ दिवसाआड पाणी मिळणार आहे. खरी परीस्थिती काय आहे माहिती दयावी.

मा.महापौर :या संदर्भात श्री.कोल्हे,श्री.पदमे,श्री.चव्हाण हे अधिकारी माझे दालनात राहतील तसेच स.सदस्य श्री.सिताराम सुरे यांनी उपस्थित रहावे या विषयावर चर्चा करून माहिती घेता येईल. लोकसभा निवडणुकीची आचारसहिंता असल्यामूळे आजची सभा तहकूब करण्यात येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |